# यशवंतराव चव्हाण कॉलेज
# इस्लामपूर जि.सांगली

## इतिहास विभाग

बी.ए.भाग.३ सत्र- ६ पे.नं. १६

## इतिहासाच्या पध्दती आणि उपयोजन

Methods & Applications of History


प्रा.डॉ.सौ.कल्पना राजीव मोहिते

प्रोफेसर इतिहास विभाग प्रमुख

# घटक-३ वस्तुसंग्रहालयशास्त्र - MUSEOLOGY

## क- वस्तुसंकलनाच्या पध्दती-

वस्तुंचे संवर्धन आणि जतन करण्याचे तंत्र

प्राचीन काळापासून आस्तित्वात असलेले,किल्ले,मंदिरे, राजवाडे व इतर वास्तूंचे आस्तित्व काही मानव निर्मित नैसर्गिक व घटकांमुळे धोक्यात येत असते त्यामुळे त्यांचे जतन व संवर्धन होणे अत्यंत्य आवश्यक आहे.

# विविध वस्तूंचे जतन व संवर्धन

अ) कागदपत्रे -

भूर्जपत्रे
ताडपत्रे
चर्मपत्रे
कागद

# विविध वस्तूंचे जतन व संवर्धन

कागदपत्रे- कागदाचा शोध लागण्यापूर्वी ताडपत्र,भूर्जपत्र, पपायरस,(लव्हाळी) व जनावरांच्या कातड्यांपासून बनवलेल्या चर्मपत्रांचा लेखनासाठी वापर केला जाई. कागदपत्रे हे इतिहासाचे अत्यंत महत्वाचे साधन आहे तेव्हा कागदपत्रांचे प्रकार,प्रगती, उत्क्रांती यांच्या अभ्यासाबरोबरच कागदपत्रांचे जतन, संवर्धन करणे आवश्यक आहे कारण गतकालीन मानवाने विविध क्षेत्रात केलेले कार्य जाणून घेण्यासाठी ही साधने आवश्यक ठरतात.

# विविध वस्तूंचे जतन व संवर्धन

- भूर्जपत्रे

कागदाचा शोध लागण्यापूर्वी भूर्ज या वृक्षाच्या सालीचा लिखाणासाठी वापर केला जाई. घनदाट अरण्यात,उंच प्रदेशात आढळणाऱ्या भूर्ज या वृक्षाची प्रथम साल काढून वाळवली जाई नंतर ती घासून व तेल लावून लिहण्या योग्य केली जाई.शाईने त्यावर लेखन केले जाई.

अशी हस्तलिखिते,भूर्जपत्रे दोन पुठ्ठ्यांच्या मध्ये ठेवून दोरीच्या साहाय्याने बांधली जात. भूर्जपत्रे नाजूक असल्याने हाताळताना योग्य ती काळजी घ्यावी लागते. भूर्जपत्रांचा संग्रह केलेल्या ठिकाणी योग्य वायुवीजनाची सोय असावी.

# विविध वस्तूंचे जतन व संवर्धन

ताडपत्रे -

ताड वृक्षाचीही पाने लिखाणासाठी वापरली जात. ताडपत्रे वाळवून पाण्यामध्ये उकळून घेतली जात. आवश्यक आकार देऊन कापली जात. ताडपत्रावर लिहिण्यासाठी धातूच्या टोकदार लेखणीचा वापर केला जाई.अशी हस्तलिखित ताडपत्रे बांधून ठेवण्यासाठी त्यांच्या दोन्ही बाजूला छिद्रे पाडून दोऱ्यांच्या साहाय्याने एकत्रित केली जात.

ताडपत्रांची लवचिकता टिकविण्यासाठी सिट्रोनेल तेल वापरले जाई.पुन्हा पुन्हा हाताळल्याने खराब होतात म्हणून अशा हस्तलिखितांचे सुक्ष्मपट किंवा मायक्रोफिल्म तयार करणे श्रेयस्कर.

# विविध वस्तूंचे जतन व संवर्धन

- चर्मपत्रे-

चर्मपत्रे ही मेंढीच्या कातडीपासून तयार केली जात. मांसापासून कातडी वेगळी करुन कातडीला मीठ व चुना यांच्या वापराने स्वच्छ केले जाते. त्यास कडकपणा प्राप्त होण्यासाठी चौकटीच्या साहाय्याने ताणून ठेवले जाई व नंतर गरम पाण्यात भिजवून घासुन घेतले जाई.

अति आर्द्रतेमुळे किंवा ओलसरपणामुळे चर्मपत्रे चिकटून खराब होतात,त्यावरील शाई निघून रंगाचे पोपडे निघतात चर्मपत्राचे रक्षण करण्यासाठी थायमोलच्या वाफेची धूरी किंवा बुरशीचा प्रार्दुभाव होऊ नये म्हणून आर्थोफेनिल व इथिल अल्कोहल या द्रावणांचा वापर केला जातो.

# विविध वस्तूंचे जतन व संवर्धन

कागद –

कागदाचा शोध सर्वप्रथम चीनमध्ये लागला. भारतात ही कला ११व्या शतकात आली.बांबू,लाकूड यासारख्या तंतूमय वनस्पती,वृक्षापासून कागद बनविला जातो.सिरस,रोझिन यांचा वापर करुन कागद लिखाणायोग्य गुळगुळीत बनविला जातो.

कागदाचा अपकर्ष टाळण्यासाठी कॅल्शिअम बायकार्बोनेटच्या द्रावणाचा वापर केला जातो. पांढरी कसर,पुस्तकी किडे,कृमी,धूळ,बुरशी,आग इ.पासून कागदांना धोका पोहचू नये यासाठी काळजी घ्यावी लागते.योग्य वातानुकूलनाचा वापर करावा.निराद्रीकारकाव्दारे वातावरणातील सापेक्ष आर्दता ६० टक्यांपेक्षा कमी राखावी. हस्तलिखिते लाल पिवळ्या कापडात व्यवस्थित ठेवावीत.खराब हाताने कागदांना स्पर्श करु नये.